# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price ₹ 3/-

# संवाद

मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।
सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।

॥ स्वयमेव मृगेंद्रता ॥

Vol.- 11 Issue 3 सप्टेंबर - २०१८ (pages - 24) September 2018


## संपादकीय

प्रिय सभासदमित्रांनो,

जगाचे रहाटगाडगे सतत चालूच असते. काळाच्या ओघात अनेक सुखद व दुःखद प्रसंग येतच असतात. त्यांना तोंड देत सुखदुःखांचा स्वीकार करीत जीवनातील मार्गक्रमणा आपण आपल्या पद्धतीने करीत असतो. सुख-दुःखाच्या प्रसंगांप्रमाणेच काही अविस्मरणीय किंवा दीर्घकाळ स्मरणात राहतील असे प्रसंगही आपल्या आयुष्यात येतात. त्यांचं स्मरणदेखील आपल्याला अनेकदा नवी उभारी व स्फूर्ती देते.

स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल) पुणे या आपल्या संघटनेची ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पुण्यात भव्य प्रमाणात व दिमाखदार रित्या दि. ४ सप्टेंबरला पार पडली. याप्रसंगी बँकेचे पुणे झोनल ऑफिसमधील उपमहाव्यवस्थापक श्री. आबिद उर् रेहमान (झोन II) अगत्यपूर्वक उपस्थित होते व त्यांनी सेवानिवृत्तांचे सर्व प्रश्न त्वरेने समाधानपूर्वक सोडविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू असं जाहीर आश्वासन दिलं. सर्वश्री विपुल अगरवाल (A.G.M) तसेच संजय दाणी व अनिल वाणी (C.M.) उपस्थित होते. त्याच वेळी बँकेच्या वतीने पेन्शनर्स मीट म्हणजेच सेवानिवृत्तांचा मेळावा देखील आयोजित केला होता. या समारंभाला सुमारे ११०० च्या वर सभासद उपस्थित होते. सभासदांचा उत्तम प्रतिसाद लाभलेल्या समारंभाला बँकेच्या क्षेत्राबाहेरील दोन प्रतिष्ठित नि सन्माननीय व्यक्तींना प्रथमच प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. त्यापैकी एक प्रमुख पाहुणे होते पुण्यातील धर्मादाय उपायुक्त श्री. नवनाथ जगताप तर दुसरे होते पुणे बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. शिवराज कदम. यापैकी धर्मादाय उपायुक्त श्री. जगताप यांचे आपल्या असोसिएशनला (जिला धर्मादाय संस्था किंवा ट्रस्ट म्हणून कायदेशीर मान्यता आहे) तिच्या कायदेशीर बाबी पूर्ण करण्यात अत्यंत मोलाचे मार्गदर्शन व साह्य झाले आहे; तर ॲड. शिवराज कदम हे आपले कायदेशीर सल्लागार आहेत.

या समारंभ प्रसंगी धर्मादाय उपायुक्त श्री. नवनाथजी जगताप यांनी प्रमुख पाहुणे म्हणून जे मोलाचे विचार मांडले त्याकडे आम्ही वाचकांचं लक्ष वेधू इच्छितो. श्री. नवनाथजींनी आपल्या मनोगतात भिकाऱ्यांचा प्रश्न सोडविण्याविषयी, महागड्या वैद्यकीय उपचारांसाठी यथाशक्ती आर्थिक साह्य देण्याविषयी आणि नेत्रदान-अवयवदान-देहदान करण्याविषयी कळकळीचे आवाहन केले. त्याचा विशेष उल्लेख करावासा वाटतो. (त्यांच्या भाषणाचा सविस्तर वृत्तांत या अंकात दिलेला आहेच.)

आपली माणसं आपली नेहमीच स्तुती व प्रशंसा करतात; पण बाहेरची महनीय नि आदरणीय व्यक्ती स्तुती वा प्रशंसा करते तेव्हा ती वास्तवतेचं दर्शन घडविणारी असते.

श्री. नवनाथजी जगताप यांना त्यांच्या अमोल मार्गदर्शनासाठी शतशः धन्यवाद.

क्रांतिसेन रामचंद्र आठवले, भ्रमणध्वनी : ९५५२५९२२७९

**(We publish hereunder the information given by the 'Shares and Bond Dept.' of S.B.I for information of our Pensioner Shareholders.)**

## MOST URGENT : FOR ALL PENSIONERS WHO ARE HOLDERS OF SBI SHARES

During a Structured Meeting of the Federation of SBI Pensioners' Associations, with the Bank Executives on 11.09.2018 at Hyderabad, it was informed by the 'Shares and the Bank Department' of the SBI as under :

- As on date, approximately 55,114 Shareholders under Employees Quota are still holding shares in Physical form. Of the above 23,388 are pensioners.
- We share the database of these pensioners sorted on the basis of their pension receipt zone.
- **(all these data-based files are available on our website : www.sbipensionerspune.org** and **concerned pensioners may refer to these files. - "Urgent News from SBI"**)
- Transfer of physical shares will be banned from 05.12.2018.
- As per Securities and Exchange Board of India (SEBI) notification dated 08.06.2018 **maintenance of shares in dematerialized form will be a must. So the efforts need to be in place to convert your physical shares into dematerialized form by 04.12.2018.**
- Shares and Bonds Department (SBD) Coordinates are :
  State Bank of India, SBD, Corporate Center, 14th Floor, State Bank Bhavan, Madame Cama Road, Mumbai-400021.**Helpline No.: 022- 22740844, 22740849, 22741431, 22741476, 22741485**
  **e-mail :** gmsharesb@sbi.co.in
- SBI Registrar and Transfer Agent (RTA) M/s Alankit Assignments Limited (AAL), Coordinates are :
  Investor Service Centre :
  R.R House, Ideal Industrial Estate, Opposite New Empire Mills, Senapati Bapat Marg, Lower Parel West, Mumbai-400013, Maharashtra. Tel. No. 022-43481300 **e-mail :**sbi.igr@alankit.com

*************************************************************************************************

### Action points for Pensioner Shareholders :-

- Verify your name in the database available with the representative.
- Verify your coordinates, almost 100% of the addresses are wrong.
- If any/most of the coordinates is wrong, fill up the Basic Information Form (BIF) and post to AAL along with all the enclosures for rectification.
- All pensioners are requested to update their coordinates urgently.
- Download BIF (click urlhttps://www.sbi.co.in/portal/documents/44589/102746115/Basic+Information+Form-BIF )
- Ensure possession of shares of Facevalue Rs. 1/- with you.
- If facevalue is Rs.100/10, shares need to be converted to face value Rs.1, you need to take up with AAL.
- If you have lost your shares, you need to take up with AAL.
- For dematerialisation : Open Demat account.Our subsidiary SBICAP Securities Ltd (SSL) is opening and maintaining Demat account for employees and pensioners for FREE.This opportunity needs to be availaed ASAP.
- If you have a demat account and there is a change inContact details, address, bank account and signatures, it needs to be updated with Depository Participant(DP).
- For any purpose, signature of shareholder has to tally with the recorded one with the DP i.e. SSL or other and RTA i.e. AAL.
- For full details regarding dematerialization, please visit our website (www.sbi.co.in) Investor Relations - Share Holder Info - Demat your shares or click on the following link
  https://www.sbi.co.in/portal/web/investor-relations/share-holder-info
- **For further / any clarifications contact either AAL/SBD.**

**अत्यंत महत्त्वाचे :-** सर्व पेन्शनर्सना सूचित करण्यात येते की ज्या पेन्शनर्सकडे स्टेट बँकेचे शेअर्स स्थूल / भौतिक / दृश्य स्वरूपात (Physical form) आहे त्यांनी असे शेअर्स ताबडतोब डी-मॅट स्वरूपात दि. ४ डिसेंबर २०१८ पूर्वीच बदलून घ्यावे. सेबीच्या दि. ८ जून २०१८ च्या परिपत्रकाप्रमाणे सर्व शेअर्स डि-मॅटेरिअलाईज्ड स्वरूपातच ठेवणे अपरिहार्य आहे. दि. ५ डिसेंबर २०१८ पासून दृश्य स्वरूपातील शेअर्स हस्तांतरण होणार नाही. याबाबतच्या सूचना याच अंकात पान २ वर दिल्या आहेत. त्या काळजीपूर्वक वाचाव्या/समजावून घ्याव्यात.

– जनरल सेक्रेटरी

# ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशनची मुंबई सर्कलची ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पुण्यातील कर्वेनगरमधील सुप्रसिद्ध 'गोल्डन लीफ लॉन'मध्ये भव्य प्रमाणात व यशस्वीरित्या संपन्न झाली. या सभेला सुमारे ११०० च्या वर सभासद आवर्जून व अगत्यपूर्वक उपस्थित होते.

पुण्यात पार पडलेल्या पेन्शनर्स असोसिएशनच्या या ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेला प्रमुख पाहुणे म्हणून पुण्याचे धर्मादाय उपायुक्त माननीय श्री. नवनाथ जगताप आणि पुणे बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. शिवराज कदम-जहागिरदार, उपस्थित होते. श्री. जगताप हे धर्मादाय उपायुक्त असल्यामुळे असोसिएशनला (आपली असोसिएशन ही धर्मादाय संस्था आहे) अनेक कायदेशीर बाबी पूर्ण करण्यात त्यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे तर ॲड. शिवराज कदम हे असोसिएशनचे कायदेशीर सल्लागार आहेत. या वेळी प्रथमच बँकेच्या वर्तुळाबाहेरील किंवा अन्य क्षेत्रातील व्यक्ती महनीय प्रवक्ते व अतिथी म्हणून निमंत्रित होत्या. हे या वार्षिक सर्वसाधारण सभेचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

या वार्षिक सर्वसाधारण सभेबरोबरच बँकेच्या वतीने 'पेन्शनर्स मीट' म्हणजे सेवानिवृत्तांचा मेळावा देखील आयोजित करण्यात आला होता. संपूर्ण कार्यक्रमास बँकेचे पुणे झोन २चे उपमहाव्यवस्थापक श्री. आबिद उर् रेहमान तसेच सर्वश्री विपुल अगरवाल (AGM) व संजय दाणी (CM-HR) व अनिल वाणी (CM-HR) हे देखील उपस्थित होते. वरील सर्व प्रमुख व्यक्तिंशिवाय व्यासपीठावर सर्कल प्रेसिडेंट श्री. एस. बी. गोखले, महासचिव श्री. विलास गंधे तसेच संघटनेचे विभागीय अध्यक्ष सर्वश्री ज्ञानप्रकाश खोब्रागडे (अमरावती), साहेबराव देसाई (औरंगाबाद), मोहन पर्वतकर (पणजी), डी. एस. वाघमारे (पुणे), सुधीर आग्रेकर (नागपूर) इ. उपस्थित होते.

वार्षिक सर्वसाधारण सभा सकाळी १०.०० वाजता रीतसर सुरू करण्यात आली. सूत्रसंचालक श्री. सुधीर पवार यांनी सर्व उपस्थितांचं स्वागत केलं. प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन झाले. श्री. अशोक पंडित यांनी ईशस्तवन सादर केले. महासचिव श्री. विलास गंधे यांनी सर्व पाहुण्यांचं, निमंत्रितांचं व उपस्थित सभासदांचं स्वागत केलं तसेच सर्व प्रमुख पाहुण्यांची थोडक्यात ओळख करुन दिली. मान्यवरांचे आलेले शुभसंदेश वाचून दाखविले.

माजी पंतप्रधान भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी भारताच्या क्रिकेटसंघाचे माजी कर्णधार व बँकेचे माजी महाव्यवस्थापक श्री. अजित वाडेकर, एम.डी.दलाल (ज्यांनी संघटनेला रु.१ लाख, ११ हजारची देणगी दिली) बँकेचे माजी अध्यक्ष श्री. दीपंकार बसु, स्टाफ फेडरेशनचे ज्येष्ठ नेते श्री. लक्ष्मी नरसैय्या, फेडरेशनचे माजी अध्यक्ष श्री. आर. एन. बॅनर्जी, श्री. एन.एस. नागराज, असोसिएशनचे या वर्षभरात दिवंगत झालेले अनेक सदस्य तसेच महापुरासारख्या नैसर्गिक आपत्तीत आणि अतिरेक्यांच्या हल्ल्यात बळी पडलेले निष्पाप जीव व जवान यांना श्री. विलास गंधे यांच्या आवाहनानुसार सर्व उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

असोसिएशनचे महासचिव श्री. विलास गंधे यांनी उपस्थित पाहुण्यांना आपल्या असोसिएशनच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेऊन संघटनेची ओळख करुन दिली. ते म्हणाले, स्टेट बँकेतील, पेन्शनरांना संघटना स्थापन करण्याची आवश्यकता १९७२-७३ च्या सुमारास तीव्रतेने भासू लागली. याचं कारण अगदी पूर्वीपासून इंपीरिअल बँकेच्या काळापासून - नाममात्र (अत्यल्प) पेन्शन मिळत असे. ६० वर्षात त्यात कुठलीच वाढ नव्हती. पेन्शनची कमाल मर्यादा रु.७५०/- तर अगदी उच्च पदावरील ज्येष्ठ अधिकाऱ्यास रु.१०००/- पेन्शन मर्यादा होती. पेन्शनरांना बँकेकडून अन्य कोणत्याही सोयी/सुविधा उपलब्ध नव्हत्या. अत्यल्प पेन्शनचे चटके पेन्शनरांना जाणवत होते. सर्वश्री ल.ना. पाबळकर, आर.एम. बाजवाला, आर.वाय.काणे अशा निवडक पेन्शनरांनी संघटना स्थापन करण्यासाठी जे निवडक तळमळीचे कार्यकर्ते उपस्थित होते त्यांची संख्या अवघी २१ होती. त्या संस्थापक सदस्यांमध्ये सर्वश्री जी.जी.वझे, सी.एस.मेहेंदळे, पी.टी.चाफळकर, व्ही.आर.धोंगडे, एस.व्ही.लेले (सर्व पुण्याचे रहिवासी), जे.जे.गुरसहानी, के. नटराजन व अन्य (मुंबईचे रहिवासी) यांचा समावेश होता. अखेर दि. १९-९-१९७४ ला 'स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन'ची

पुण्यात स्थापना झाली. या संघटनारूपी वेलीचे आता वटवृक्षात रूपांतर झाले असून तिची सभासद संख्या २५ हजाराहून अधिक झाली आहे.

निवृत्तांच्या न्याय्य हक्कांसाठी झटणारी पेन्शनरांची ही संघटना असून या संघटनेने अनेक मागण्या उदा. सुधारीत पेन्शन, फॅमिली पेन्शन, कमीत कमी पेन्शन, वैद्यकीय मदत इ. मान्य करुन घेतल्या आहेत. या संघटनेला बँक कायदेशीर मान्यता देऊ शकत नसली तरीबँकेच्या व्यवस्थापनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी वा शासनातील अधिकाऱ्यांशी चर्चा करुन त्यांना चर्चेद्वारे पेन्शनरांच्या न्याय्य मागण्या पटवून दिल्यामुळे त्याचा लाभ सभासदांना आजवर झालेला आहे. अगदीच निरुपाय झाला व पेन्शनरांना न्याय चर्चेद्वारे मिळाला नाही तर अखेरचा उपाय म्हणून न्यायालयीन मार्गदेखील संघटनेमार्फत अवलंबिण्यात आला आहे. आज आमची ५०% पेन्शनची मागणी उच्च न्यायालयात अनेक वर्षांपासून प्रलंबित असून आता न्यायालयीन प्रक्रिया अंतिम टप्प्यात आलेली आहे. या संदर्भात पेन्शनरांना योग्य तो न्याय लवकरच मिळेल अशी आपण आशा करुया.

आमची असोसिएशन ही सर्कल लेव्हलवरील संघटना असून अखिल भारतीय पातळीवरील म्हणजे सर्व सर्कल असोसिएशन्सचा अंतर्भाव असलेली 'फेडरेशन' ही राष्ट्रव्यापी संघटना आहे. यात मुंबई सर्कलची संघटना सर्वात मोठी असून फेडरेशनच्या कार्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. फेडरेशनच्या वरिष्ठ मंडळावरील अनेक सदस्यांनी आपल्या नोकरीच्या कार्यकळात बँकेतही उच्च पदे भूषविलेली आहेत. त्यामध्ये श्री. पी.जी. काकोडकर (बँकेचे भूतपूर्व अध्यक्ष), बी.आर.गद्रे, (चीफ जनरल मॅनेजर - CGM), एन.एस.कुलकर्णी (CGM), श्री.बी.के.घोष (Ex.D.M.D.) आर.एन.बॅनर्जी (G.M.) यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

आमच्या स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल) चे संस्थापक सदस्य आदरणीय श्री.ल.ना. पाबळकर यांच्या पश्चात त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ 'ल.ना.पाबळकर स्मृती सुवर्णपदक' एका निरलस व सर्वस्व झोकून कार्य करणाऱ्या आदर्श कार्यकर्त्यास देऊन गौरव करावा असा निर्णय संघटनेने घेतला व त्यानुसार सन १९९९ पासून तो कार्यवाहीत आणला.

आमच्या असोसिएशनच्या वतीने 'संवाद' नावाची मासिक गृह पत्रिका दर महिन्याला नियमितपणे २००४ पासून प्रसिद्ध होत असून त्याद्वारे सभासदांना वेळोवेळी बँकेच्या निघणाऱ्या परिपत्रकांविषयी व त्यांच्याशी संबंधित सर्व माहिती दिली जाते. तसंच त्यांच्यातील सुप्त लेखनगुणांना प्रोत्साहन देण्यासाठी लेख-कवितादि साहित्य छापले जाते.

आधुनिक तंत्रज्ञानाला अनुसरुन असोसिएशनची स्वतंत्र वेबसाईट - www.sbipensionerspune.org - असून त्यावर असोसिएशन संबंधी व सभासदांना उपयुक्त सर्व माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच तेथे 'संवाद' मासिक गृहपत्रिकेचे जुलै २००७ पासूनचे सर्व अंक उपलब्ध आहेत.

वयाची ७५ वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व सभासदांचा शुभेच्छा दर्शक सन्मान केला जातो तसेच वाढदिवसानिमित्त सर्व सभासदांना शुभेच्छापत्रे पाठविली जातात. अशी दरमहा सुमारे २००० पत्रे वेळेवर पाठविली जातात. हे महत्त्वाचे पण किचकट काम श्री. प्रमोद चाटे करतात.

श्री. विलास गंधे यांनी संघटनेविषयी उपस्थित पाहुण्यांना पुरेशी माहिती सादर केल्यानंतर 'स्वर्गीय श्री.वासुदेवराव गंधे व श्रीमती उमाबाई गंधे' स्मृति पुरस्कार श्री. प्रभाकर गुपचूप (संपादक संवाद) व श्री. डी.ए.कुलकर्णी (पुणे मुख्य कार्यालयाचे खजिनदार) यांना सन्मापूर्वक अध्यक्षांच्या हस्ते देण्यात आला. त्याला उभय पुरस्कार विजेत्यांनी समर्पक उत्तर देऊन कृतज्ञता व्यक्त केली. पेन्शनर ग्राहकांना बँकेत सहानुभूतीपूर्ण व सक्षम सेवा देण्यासाठी तत्पर असणाऱ्या श्री. निवृत्ती चहाणे (दत्तवाडी शाखा) व सौ. सुजाता जमादार (टिळक रोड शाखा) असोसिएशनच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला.

सोलापूर जिल्ह्यातील असोसिएशनचे प्रमुख सचिव श्री. त.म.पाटील यांनी संघटनेला दिलेल्या सर्वंकष योगदानासाठी त्यांना 'स्वर्गीय श्री.ल.ना.पाबळकर स्मृती सुवर्ण पदका' ने सन्मानित करण्यात आले. असोसिएशनचे अध्यक्ष श्री.एस.बी.गोखले यांच्या शुभहस्ते श्री. त.म.पाटील यांचा शाल-श्रीफळ-पुष्पगुच्छ व सन्मानदर्शक सुवर्ण पदक व

प्रशस्तीपत्र देऊन टाळ्यांच्या गजरात सर्वोच्च पुरस्काराने गौरव करण्यात आला. श्री. वसंत धुपकर यांनी प्रशस्तीपत्राचे वाचन केले. सत्काराला श्री.त.म.पाटील यांनी उचित शब्दात उत्तर देऊन जाहीर कृतज्ञता व्यक्त केली.

असोसिएशनचे व सभेचे अध्यक्ष श्री.एस.बी.गोखले यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे श्री. नवनाथ जगताप (धर्मादाय उपायुक्त) व अॅड. शिवराज कदम (पुणे बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष) यांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्याचप्रमाणे बँकेचे पुणे झोनल ऑफिसमधून आलेले बँकेचे प्रतिनिधी सर्वश्री आबिद उर रेहमान (DGM - Zone II), विपुल अगरवाल (AGM), संजय दाणी व अनिल वाणी यांचे पुष्पगुच्छ देऊन असोसिएशनच्या वतीने स्वागत करण्यात आले.

त्यानंतर समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या अॅड.शिवराज कदम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, ''तुमच्या पेन्शनर्स असोसिएशनला वकील म्हणून सल्ला व मार्गदर्शन करण्यास मला नेहमीच आवडेल. कारण ही संघटना सभासदांसाठी व समाजासाठी विधायक कार्य करण्यातच गुंतलेली असून व त्यांच्याच कल्याणार्थ झटणारी संघटना आहे याविषयी माझी खात्री पटलेली आहे. मला या संघटनेला साह्य करण्यास नक्कीच आवडेल व तसे मी आश्वासन देतो.''

दुसरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले व असोसिएशनला अमूल्य मार्गदर्शन व साह्य करणारे माननीय धर्मादाय उपायुक्त श्री. नवनाथ जगताप सभेला संबोधित करताना आपल्या मनोगतात म्हणाले, ''तुमची संघटना वयाने व अनुभवाने ज्येष्ठ असणाऱ्या बँकेतील निवृत्त सभासदांची आहे. पण तरुणांनाही लाजवील असा उत्साह मला प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर जाणवतो आहे. अत्यंत कार्यक्षमतेने आणि पद्धतशीर कार्य करण्याचा आपला कटाक्ष असल्याचं मला अनुभवास आलं आहे. पेन्शनर्स असोसिएशन ही मूलतः धर्मादाय संस्था असल्यामुळे त्या संदर्भात काही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करणं आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक ते सर्व उपचार आपण तत्परतेने पूर्ण करण्याचं ठरवून त्यानुसार कृती केली. आवश्यक ती सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन ती सादर केलीत हे मी आपल्या पदाधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष कृतीवरुन अनुभवलं आणि मला ही संघटना अगदी जवळची वाटू लागली. आपल्यातील स्नेह व जवळीक वाढतच जाईल अशी मला खात्री वाटते. या निमित्ताने मी आपणास कळकळीची विनंती करू इच्छितो की आज अनेक प्रश्न समाजाला भेडसावत आहेत. त्यांची सोडवणूक करण्यासाठी आपणास मी आवाहन करतो की आपण यापुढे दये पोटीदेखील भिकाऱ्यांना भीक देऊ नका. भीक देणे ताबडतोब बंद करा. त्यामुळे त्यांच्या आडून चालणारा समाजद्रोह्यांचा बंदोबस्त होईल. त्यांचे अवैध धंदे बंद होतील आणि भिकाऱ्यांचाही प्रश्न कायमचा सुटेल. त्याचप्रमाणे आज डायलिसिस सारखे वैद्यकीय उपचार अत्यंत महागडे झाल्यामुळे ते दुर्बल घटकांना परवडत नाहीत. त्यासाठी आर्थिक साह्य आवश्यक आहे. तसंच नेत्रदान-अवयवदान-देहदान यांना आपण प्रतिसाद देणं जरुरीचं आहे. रक्तदान देखील आवश्यक आहे. अशा उपक्रमांना साह्यभूत होऊन समाजऋण फेडण्याचा आपापल्या परीने निश्चय करा व त्यासाठी साह्यभूत व्हा.

श्री. जगताप यांच्या तळमळीच्या आव्हानामुळे सर्व उपस्थित भारावून गेले. त्यांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करुन पाहुण्यांच्या आवाहनास प्रतिसाद दिला.

------------------------

अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात ज्या उपस्थित सभासदांचे वाढदिवस आज म्हणजे ४ सप्टेंबरला आहेत त्यांचा सन्मान गुलाबपुष्प देऊन करण्यात आला व त्यांना असोसिएशनतर्फे वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

'संवाद' ने आयोजित केलेल्या निबंधस्पर्धेत विजयी ठरलेल्या उपस्थित स्पर्धकांना पारितोषिके देऊन त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. 'संवाद'चे स्पर्धा संयोजक श्री. प्रभाकर गुपचूप यांनी या छोट्याशा कौतुक समारंभाचं निवेदन केलं. या स्पर्धेत एकूण ६६ स्त्री-पुरुष सभासदांनी भाग घेतला होता. स्पर्धेचा निर्णय 'संवाद' मध्ये प्रसिद्ध करण्यात आला आहे.

या वर्षी नागपूर विभागासाठी असलेला पुरस्कार 'एन.जी.मोरे स्मृति पुरस्कार' श्री. अनिल पिंपळापुरे आणि एन.जी.देशपांडे यांना मिळाल्याचे जाहीर करण्यात आले व विजेत्यांचे अभिनंदन करण्यात आले. श्री. अनिल पिंपळापुरे

यांना अध्यक्षांचे हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्री. डी.अे.कुलकर्णी, खजिनदार यांनी सादर केलेला सन २०१७-१८ चा वार्षिक ताळेबंद एकमताने मंजूर झाला.

त्यानंतर महासचिवांनी औरंगाबाद येथे पार पडलेल्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेतील सादर केलेल्या अहवालास तसेच मॅनेजिंग कमिटीच्या वार्षिक अहवालास उपस्थितांनी मान्यता दिली.

महासचिव श्री. विलास गंधे यांनी नेहमीच्या प्रथेनुसार काही ठराव सभेपुढे सादर केले त्यांनादेखील उपस्थितांनी एकमताने टाळ्यांच्या गजरात अनुमोदन देऊन पारित केले.

सभासदांच्या प्रश्नोत्तरांचा तास समाधानकारकपणे पार पडला.

असोसिएशनचे अध्यक्ष माननीय श्री.एस.बी.गोखले यांनी संघटनेच्या वाटचालीचा व प्रगतीचा थोडक्यात आढावा घेतला व उपस्थित सभासदांना वस्तुस्थिती कथन करुन न्यायालयाकडून चांगल्या व अनुकूल निकालाची अपेक्षा व्यक्त केली. त्यांनी पेन्शनमधील अनेक अनियमिततांचा पाठपुरावा बँकेकडे चालू असल्याचे सांगितले.

-----------------------

सर्कलचे निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्त केलेले माननीय श्री. सुधीर पवार यांनी जाहीर केले की एकूण चार जागांसाठी प्रत्येकी एकच अर्ज आल्याने सुदैवाने निवडणूक घ्यावी लागणार नाही. सर्व पदाधिकारी एक मताने निवडून आले आहेत. श्री. पवार यांनी सर्कल असोसिएशनच्या निवडणुकीचा निकाल खालीलप्रमाणे जाहीर केला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | - | श्री. एस.बी. गोखले | सचिव | - | श्री. एन.बी.कुलकर्णी |
| महासचिव | - | श्री. विलास गंधे | खजिनदार | - | श्री. विष्णु मुकीम |

उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

-----------------------

या वार्षिक अधिवेशनाबरोबरच 'पेन्शनर्स मीट' अर्थात पेन्शनरांच्या मेळाव्याचे बँकेच्या वतीने विशेष आयोजन करण्यात आले होते.

पेन्शनरांचे विविध प्रश्न प्रातिनिधिक व संयुक्तरित्या श्री.एन.बी.कुलकर्णी यांनी लिखित स्वरूपात (व सर्वांसमक्ष त्यांचं वाचन करुन) बँकेच्या उचित कार्यवाहीसाठी सादर केले. सर्व प्रश्न बँकेच्या उपस्थित प्रतिनिधींनी (सर्वश्री. आबिद उर रेहमान (DGM - II), विपुल अगरवाल (AGM), संजय दाणी व अनिल वाणी (C.M.) यांनी लक्षपूर्वक ऐकून घेतले. या सर्व प्रश्नांचं - समस्यांचं निराकरण शक्य तो त्वरेने व आवश्यक त्या पाठपुराव्यासह करण्यात येईल असं जाहीर आश्वासन बँकेच्या वतीने त्या सर्वांनी दिलं.

-----------------------

सर्वश्री. एन.बी.कुलकर्णी, डी.एस. वाघमारे, सुधीर पवार यांनी वेगवेगळ्या सत्रातून आभार प्रदर्शन केले.

सोलापूरचे सभासद श्री. डी.आर.बेंद्रे यांनी सुस्वर पद्धतीने 'पसायदान' सादर केले व दिवसभर चाललेल्या या अधिवेशनाची म्हणजेच ४४व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची व पेन्शनर्स मीटची यशस्वीपणे सांगता झाली. सभेतील जेवणाच्या सुटीत तसेच सभा संपल्यानंतर जवळ जवळ शेकडो सभासदांनी संपूर्ण सभा अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीत व वेळेत पार पडली याबद्दल तसेच भोजन रुचकर असल्याबद्दल आनंद व समाधान व्यक्त केले. या सर्व साधारण सभेच्या आयोजनासाठी ज्या अनेक समित्या स्थापन केल्या होत्या त्या सर्व सभासदांनी गेले दीड महिना जी मेहनत घेतली त्याचे हे फलित आहे. या सर्व समित्यातील सर्व कार्यकर्त्यांचे, सभेस आवर्जून उपस्थित राहिलेल्या सर्व सभासदांचे मनापासून आभार. श्री. सुधीर पवार यांनी उत्कृष्टपणे सूत्रसंचालन केल्यामुळे मिटींग वेळेत पार पडली. त्यांचे पण मनःपूर्वक आभार.

सर्वांना उत्तम प्रकृति व दीर्घायुष्य लाभो.

विलास गंधे, महासचिव

## OUR 44$^{TH}$ ANNUAL GENRAL MEETING AT PUNE ON 4$^{TH}$ SEPT. 2018

We are pleased to inform all our Members that the 44$^{th}$ AGM at Pune held on 4$^{th}$ September 2018 in the newly selected spacious and well decorated premises, was a grand success and the response was overwhelming as more than 1100 members attended the Meeting. Over a few hundreds of our Members during the lunch period as well as after the Meeting was over, expressed their spontaneous satisfaction and happiness over the perfectly disciplined, well managed AGM as well as for maintaining the time schedule in the conduct of the Meeting right from start to finish. A few have written to us in this regard and we are publishing their letters hereunder for information of the Members. The compering was done by Shri Sudhir Pawar which was highly appreciated by many Members. However, the success of the AGM is fully attributed to the 'Team Efforts' of all the 'Committee Members' working relentlessly for one and half months preceding the Meeting in making various preparations of the AGM. So, we place on record our appreciation to all the following Committee Members (as well as those who were not in any Committee but offered their voluntary services on the date of AGM, and therefore their names could not be figured in the list) for taking untiring efforts in making the AGM a grand success. We are also publishing a list of all these 'Committee Members' with their mobile numbers. We also extend our sincere thanks to all the Members who were present (since many of them came from faraway places of Maharashtra and Goa) for the Meeting as without them the Meeting would not have been such a big success.

**Vilas Gandhe, General Secretary and S. B. Gokhale, President**

*****************************************************************

The General Secretary, Dear Sir,

**Subject - 44tn Annual General Meeting held on 04. 09. 2018 at Pune**

The Circle A.G.M. was organised at Golden Leaf Lawns near Mhatre bridge, Pune. It has been observed to be a unique example for organisation of this meeting on a new venue. The hall was covered by a decorative pandol with capacity to manage around 1200 pensioners. The entire area was beautifully decorated by colourful curtains and other scenic material. The outlook created was, as if some celebration has been organised. It has been proudly noted that amongst the V. I. Ps. the Dy. General Manager of Pune Zonal Office, Zone II, AGM Reg I, and two C. Ms. (HR), were present. In addition to this the attendance of Shri Navnath Jagtap, the Dy. Charity Commissioner as a Chief Guest was a unique attraction.

The entire meeting was conducted in a very disciplined manner so that no room was left out to miss the sequence of the agenda of the AGM. It is understood that this discipline was due to various teams formed and planned under the leadership of our General Secretary, Mr. Vilas Gandhe Saheb. I would like to make a special mention that the entire meeting was well planned, disciplined in all respects and provided exceptionally excellent quality of food arrangements and therefore the end of the meet was 'Sweet'.

I can't resist myself to express the above few words as my gratitude towards the General Secretary, Mr. Gandhe Saheb and his team. So also, the speech of Shri S. B. Gokhale, Circle President was so affluent that every doubt / query in the minds of pensioners was covered to their satisfaction. Therefore, all the participants were satisfied as regards the recent developments, court cases etc. Shri Sudhir Pawar, Ex-Joint Secretary of the Circle Association, compered the entire proceedings of the AGM in a lucid manner.

I join with my fellow pensioners from Solapur Dist. in conveying sincere thanks and congratulation to the entire team for their excellent arrangements.

With regards,

**Shri T. M. Patil, District Secretary and all the Members of Solapur Unit**

(Shri T. M. Patil, Secretary Solapur District and many Members from Solapur Unit have signed this letter.)

---------------------------------------------------

Thanks for the update. Happy to note that this 44th AGM was a grand success than usual. Congratulations to you Sir and all the Office Bearers for this Grand Success. I am sure Pension Revision will be effected during your regime only. Because coming events have already started casting their shadows. With Highest Respects. ................. **RAM CHANDORKAR, Nagpur**

---------------------------------------------------

महोदय, दि. ४/९/१८ आपली ४४ वी सर्वसाधारण सभा अत्यंत नीटनेटकी व सलोख्याच्या वातावरणात पार पडली, त्याबद्दल आपल्या सर्व टिम चे अभिनंदन, श्री.गंधे साहेब व त्यांच्या टिमने आम्हाला सहकार्य केल्याबद्दल आभार. तसेच आपले नवीन कार्यवाह श्री.कुलकर्णी साहेब यांचे व त्यांच्या नवीन सहकार्यांचे स्वागत व शुभेच्छा! ............... **सुरेश छत्रे सांगली.**

---------------------------------------------------

Shri Vilas Gandhe, Heartiest congratulations to you and your entire dedicated Team for having conducted the AGM in a well systematic and disciplined manner and made entire function a grand success. Over 1100 participants…….WOW a very good attendance. I, really missed the programme, and lost the chance to meet you all. Sirji, you and your leadership deserve appreciations.

Thanks for your concern, I have health-wise improved a lot. God bless you. With warm regards.

.............**Vazirani C. N., Nagpur.**

---------------------------------------------------

List of various Committee Members who helped in organising the 44th AGM

| **Name of the Committee/Member** | **Mob** | **Name of the Committee/Member** | **Mob** |
|---|---|---|---|
| **1) Swagat Samitee:** | | | |
| 1) Shri D. V. Dandekar | 9552527254 ♦ | 2) Shri V. N. Karmarkar | 9850587218 |
| 3) Shri V. R. Kumbhojkar | 7720077843 | 4) Shri Avinash Deshpande | 9665954088 |
| 5) Shri Gajanan Chiplunkar | 9822370987 | 6) Shri G. N. Joshi | 9860770645 |
| 7) Shri V. M. Bhalerao | | 8) Smt. Swati Rajurkar (She is not a staff member. She does all the accounting work of the Association in Tally and she comes willingly for every AGM to offer her voluntary services) | |
| 9) Smt. Asha Joshi | 9923695732 | 10) Smt. Palshikar | 9850812475 |
| 11) Shri Gadgil | | 12) Sau Madhuri Dhupkar | 9049988071 |
| 13) Shri Avinash Kothurwar | | 14) Shri Ganesh Gurjar | “ |
| **Co-Ordinators :** | | | |
| 1)Shri D. A. Kulkarni | 9881432373 | 2) Shri Anil Khadilkar | 9850984045 |

**2) Vyaspeeth Samitee**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) Shri P. H. Chate | 9823938486 ♦ | 2) Shri S. G. Belsare | 8433723484 * |
| 3) Shri Vishnu Mukim | 9881204066 | 4) Shri M. M. Sirdeshmukh | 9860295392 |
| 5) Shri V. L. Sarpotdar | 9421018705 | 6)' Shri Milind Patil | 9422229404 |
| **Co-Ordinator:** ........................................................ | | Shri A. S. Tuljapurkar | 9890226154 |

**3) Asan Vyavastha Samitee**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) Shri P. R. Gupchup | 9881579499 ♦ | 2) Shri Achyut Phatak | 9011492695 |
| 3) Shri Sharad Shingvekar | 9405026412 | 4) Shri P. B. Kulkarni | 9822406692 |
| **Co-Ordinator:**........................................................ | | Shri V. R. Kulkarni | 9833108550 * |

**4) Bhojan Samitee**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) Shri D. S. Waghmare | 9822555147 ♦ | 2) Shri Arvind Konarde | 9850566249 |
| **Co-Ordinator:** ........................................................ | | Shri Ashok Pandit | 9422316146 |

**5) Nivas Samitee**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) Shri V. G. Muley | 9881508141 ♦ | 2) Shri S. R. Thite | 9423238875 * |
| 3) Shri M. D. Kulkarni | 9423534809 * | 4) Shri S.V. Chandrachud | 9422338430 * |
| 5) Shri V. S. Jog | 9881712154 * | 6) Shri Satish Raipurkar | 9527136130 |
| **Co-Ordinator:** ........................................................ | | Shri V. N. Kulkarni | 9371058567 * |

**6) Satkar Samitee**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) Shri V. V. Dhupkar | 8975218049 ♦ | 2) Shri S.D. Marathe | 9822329770 |
| 3) Shri B. P. Sejul | 9850892857 | 4) Shri N. P. Nirokhekar | 7588276004 |
| 5) Shri Sharad Sheth | 9420178749 | | |
| **Co-Ordinator:** ........................................................ | | Shri N. B. Kulkarni | 9422324239 |

**(*These volunteers also helped the Bhojan Samitee on the day of the AGM.)**

**Election Commitee and other -** 1) Shri Krantisen Athawale 9869941691

**(*These are the Group Leaders of the respective group)**

## List of Donations from Panaji ZSC
## who have given Donations during 2017 but left to be published in 'Samvad'

| | | | |
|---|---|---|---|
| MR.SADCHITANAND ADWALPALKAR | 10000 | MR.RANJAN M.KORDE | 1000 |
| MR.KASHIRAM B.KAMBLE | 10000 | SMT.MAYA J.SHENOY | 1000 |
| MR.VILAS K.VASTA | 1000 | MT.SHYAM V.SAWANT | 1000 |
| MR.ULHAS K.NAIK | 1000 | MR.BAILAPPA KRISHNAMURTHY | 5000 |
| MR.MARCELINO RODRIGUES | 1000 | SMT.ARUNA THALY | 2000 |
| MR.RAMCHANDRA & SMITA BANDEKAR | 7500 | A WELLWISHER (513620) | 2660 |

# श्रद्धांजली...



दि. ४ सप्टेंबर २०१८ रोजी पुणे येथे आपली ४४वी वार्षिक सर्वसाधारण सभा अत्यंत उत्साहात चालू होती. साधारण १२ ।। च्या सुमारास काहीतरी धावपळ चालू होती. पण काही महत्त्वाच्या कामानिमित्त सभा चालू असताना अशी धावपळ होत असतेच. १ वाजता जेवणासाठी सभेला एक तासाची सुट्टी जाहीर करण्यात आली आणि त्याच वेळेस श्री. भास्कर देशपांडे, आपले अहमदनगर जिल्ह्याचे सचिव, यांचे अकाली दुःखद निधन झाल्याची बातमी वाऱ्यासारखी सभागृहात पसरली. या बातमीवर कोणाचाही विश्वास बसणे शक्य नव्हते. पण दुर्दैवाने ही बातमी खरी होती आणि विश्वास ठेवण्याशिवाय गत्यंतर नव्हते. श्री. भास्कर देशपांडे यांना लगेचच २ मिनिटे शांत उभे राहून अत्यंत जड अंतःकरणाने श्रद्धांजली वाहण्यात आली.

श्री. देशपांडे यांचा व माझा प्रथम संबंध १९८९-९० साली आम्ही दोघेही औरंगाबाद झोनल ऑफिस, रिजन एक मध्ये एकत्र काम करताना आला. त्यानंतर ३ वर्षांपूर्वी ते जेव्हा पेन्शनर्स असोसिएशनचे अहमदनगर जिल्ह्याचे सचिव झाले, तेव्हा कामानिमित्त आमच्या वारंवार भेटी सुरू झाल्या. सर्कल असोसिएशनच्या व्यवस्थापन समितीचे पण ते सभासद होते. असोसिएशनचे काम सुरू केल्यानंतर लगेचच त्यांच्या धडाडीने काम करणाऱ्या वृत्तीची झलक सर्वांना दिसावयास लागली. ७व्या बायपर्टाईटच्या पेन्शनर्सना थकबाकीची रक्कम मिळावयास लागली, त्यानंतर काही महिन्यातच त्यांनी अहमदनगर जिल्ह्याची वार्षिक सभा घेतली. या सभेस ३००च्या आसपास उपस्थिती होती. अहमदनगरचे रिजनल मॅनेजरसह बँकेचे अनेक पदाधिकारी व शाखा प्रबंधक उपस्थित होते. श्री. देशपांडे यांचा अत्यंत बोलका स्वभाव, सर्वांशी चांगले संबंध व सभासदांची कामे अत्यंत मनापासून व तळमळीने करणे या त्यांच्या गुणांमुळेच त्यांनी सर्वांची मने जिंकून सर्व संबंधितांशी चांगले संबंध प्रस्थापित केले होते. नवीन विमा योजना पेन्शनर्ससाठी लागू झाल्यानंतर लगेचच त्यांनी अहमदनगरमध्ये मला बोलावून सभा घेण्यास सांगितले होते. त्या सभेस विमा कंपनीचे पण अधिकारी आले होते. पेन्शनर्सची अनेक कामे उदा. ७ व्या बायपार्टाईटच्या पेन्शनर्स/फॅमिली पेन्शनर्सना थकबाकी मिळणे, लाईफ सर्टिफिकेट देणे, इन्शुरन्स चे क्लेम मिळवणे, पॉलिसी नूतनीकरणानंतर त्यांचे कार्डस् मिळवणे, इन्शुरन्स पॉलिसीच्या अनेक अडचणी सोडविणे, नवीन मेंबर्स करणे, देणग्या मिळविणे, फॅमिली पेन्शन मिळवून देणे. तसेच बँकेच्या कामात येणाऱ्या अडचणी सोडविणे, अशी एक ना अनेक, कामे करुन पेन्शनर्सना ते अत्यंत कळकळीने व मेहनतीने मदत करीत होते.

असोसिएशनच्या निवडणुकी संबंधीचे नियम तयार करण्याच्या समितीवर माझेबरोबर त्यांनी भरपूर काम केले होते. तसेच असोसिएशनचे नियम व उपनियम यात आम्ही खूपच बदल केले होते. त्या कामातपण त्यांनी मला मदत केली होती. औरंगाबाद व नागपूर येथील वार्षिक व विशेष सभांचे सूत्र-संचालन त्यांनी यशस्वीपणे केले होते. असिस्टंट जनरल मॅनेजर म्हणून ते निवृत्त झाले असले तरी, कोणत्याही प्रकारचा अहंपणा त्यांच्यात औषधालाही नव्हता. कोणतेही काम शिकण्याची त्यांची जबरदस्त इच्छा असायची.

एकदा रविवारी सर्वश्री दांडेकर साहेब व गोखले साहेब यांचेकडून पेन्शन, फॅमिली पेन्शन कसे काढतात तसेच पेन्शनसंबंधीची इतर कामे शिकण्यासाठी ते व मी आपल्या ठाणे ऑफिसला गेलो होतो. कोणत्याही कामाचा त्यांना कंटाळा येत नसे व कमीपणा वाटत नसे. ७ व्या बायपर्टाईटच्या पेन्शनर्स कडून जवळ जवळ रु.३.५० लाखाच्या वर देणग्या त्यांनी आपल्या संस्थेस मिळवून दिलेल्या आहेत. याबद्दल औरंगाबादच्या वार्षिक सभेत त्यांचा सत्कारदेखील करण्यात आला होता. सर्वांशी चांगले व जिव्हाळ्याचे संबंध असल्यानेच हे शक्य होते.

श्री. भास्कर देशपांडे यांच्या अत्यंत अकाली व दुःखद निधनामुळे, नावाप्रमाणे तेजस्वी असणाऱ्या त्यांच्या कर्तृत्वाचा जरी अस्त झाला असला तरी त्यांनी केलेले कार्य व त्यांच्या आठवणीमुळे ते कायमच सर्वांच्या स्मरणात राहतील. ते गेल्यामुळे अहमदनगर जिल्हाच नाही तर आपली सर्कल असोसिएशन पण एका अत्यंत कार्यक्षम व धडाडीच्या कार्यकर्त्यास मुकली आहे.

श्री. देशपांडे यांचे अकाली जाणे सर्वांनाच चटका लावून गेले. त्यांच्या सर्व कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सर्व पदाधिकारी सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच परमेश्वरचरणी प्रार्थना.

**विलास गंधे**, जनरल सेक्रेटरी

List of members who have given Donations for 'LEGAL FUND' on receipt of arrears as also who have given Donations to the Association on other occasions during April 2018 & July 2018 (Kindly refer to the earlier lists printed in 'Samvad' for January, March & April 2018)

We are thankful to the following members & request others to Donate for Legal Fund

****************************************************************************************************

**AMRAVATI**

| | |
|---|---|
| SMT.S.ANSINGKAR | 5000 |
| MR.NANA NAMDEO KALE | 5000 |
| MR.Y.T.KAWALE | 5000 |
| MR.PRAKASH SANGVIKAR | 5000 |
| MR.PANNALAL C.SOMANI | 5000 |
| MR.PRAMOD T.CHIKOLE | 3020 |
| MR.S.S.HISSAL | 3020 |
| MR.S.V.KONDOLIKAR | 3020 |
| MR.MADHAV K.BHAGWAT | 1000 |
| MR.D.B.KHOBRAGADE | 1000 |
| MR.VIVEK V.PATRIKAR | 1000 |
| MR.KAMALKISHOR H.RATHI | 1000 |
| MR.DEVAKINANDAN H.SHARMA | 1000 |
| MR.N.P.CHANDAK | 200 |
| MR.M.A.SHRISAT | 150 |
| MR.P.S.BORDE | 100 |
| MR.S.W.KHAJURKAR | 100 |
| MR.P.N.MOZARKAR | 100 |
| MR.S.A.PANNASE | 100 |
| MR.N.B.BHISE | 50 |

**AURANGABAD**

| | |
|---|---|
| MR.RAJARAM M.PANDIT | 5000 |
| MR.EKNATH GANGARAM MALI | 1001 |
| MR.K.D.AHIRRAO | 1000 |
| MR.L.U.BHAISANE | 1000 |
| MR.V.R.BUCHAKE | 1000 |
| MR.K.B.CHANDRATRE | 1000 |
| MR.M.K.CHUKEWAD | 1000 |
| MR.R.S.DESAI | 1000 |
| MR.S.M.DESHMUKH | 1000 |
| MR.G.L.DESHPANDE | 1000 |
| MR.H.D.DESHPANDE | 1000 |
| SMT.NIRAJA S.GORE | 1000 |
| MR.J.S.JIWANE | 1000 |
| MR.K.H.JOGI | 1000 |
| MR.A.J.JOSHI | 1000 |
| MR.S.N.JOSHI | 1000 |
| MR.S.B.KAMATHI | 1000 |
| MR.D.S.KARALE | 1000 |
| MR.A.N.KAVISHWAR | 1000 |
| ASRAR AHMED ABDUL KAZI | 1000 |
| MR.U.H.KHADAKIKAR | 1000 |
| MR.D.M.KULKARNI | 1000 |
| MR.R.C.KULKARNI | 1000 |
| MR.SATISH S.KULKARNI | 1000 |
| MR.V.K.LATKAR | 1000 |
| MR.N.M.LONARI | 1000 |
| MR.R.S.LOTE | 1000 |
| MR.B.C.MORE | 1000 |
| MR.SHANKAR K.NALE | 1000 |
| MR.CHANDRAKANT T.NANAVARE | 1000 |
| MR.R.L.NAWATHE | 1000 |
| MR.MAHAVIR D.PALSE | 1000 |
| MR.J.D.PALSE | 1000 |
| MR.K.D.PATHRIKAR | 1000 |
| MR.R.N.PATIL | 1000 |
| MR.B.R.PATKI | 1000 |
| MR.SHRIDHAR J.PETHKAR | 1000 |
| MR.A.N.PURANIK | 1000 |
| MR.G.H.SHAH | 1000 |
| MR.A.D.SHAIKH | 1000 |
| MR.A.D.SHIRSALE | 1000 |
| MR.P.C.SURYAWANSHI | 1000 |
| MR.VASANT B.TAYADE | 1000 |
| MR.K.R.TRIVEDI | 1000 |

**MUMBAI**

| | |
|---|---|
| SMT.SUNANDA ABHYANKAR | 10000 |
| SMT.VIJAYA GHAG | 10000 |
| MR.VIJAY MATHURE | 10000 |
| MR.SURESH PATHARE | 10000 |
| MR.S.R.SAMANT | 10000 |
| A WELLWISHER | 10000 |
| MR.SHIVAJI K.VASKAR | 9073 |
| SMT.NANDA B.KHEDEKAR | 7500 |
| SMT.VIDULA THUSE | 5500 |
| MR.J.J.LALWANI | 5101 |

| | |
|---|---|
| SMT.RANJANA BANGERA | 5001 |
| MR.RANGNATH V.BHAVE | 5000 |
| MR.HANUMANT DALVI | 5000 |
| SMT.VARSHA DONDE | 5000 |
| SMT.SHOBHA GUPTE | 5000 |
| MR.RAVINDRA HADKAR | 5000 |
| SMT.MEENA HIRANANDANI | 5000 |
| MR.SUDHAKAR NARKAR | 5000 |
| SMT.ASHA NIMONKAR | 5000 |
| MR.ANIL KUMAR PRADHAN | 5000 |
| SMT.SHUBHADA SAMANT | 5000 |
| SMT.CHARULATA SAVE | 5000 |
| SMT.SWARNALATA S.SAWANT | 5000 |
| MR.ACHYUT S.KELKAR | 3000 |
| MR.KUNDANLAL N.KURIL | 2251 |
| MR.SANJAY R.BAGWE | 2010 |
| MR.KAMALAKAR K.KULKARNI | 2001 |
| SMT.HEMA TAHIRAMANI | 2001 |
| SMT.A.A.NAGRAJ | 2000 |
| SMT.ANAGHA PATWARDHAN | 2000 |
| MR.DILIP S.HAZARE | 1020 |
| A WELLWISHER | 1010 |
| MR.VISHWANATH A.KHADAKE | 1001 |
| MR.ANANT MAHADEVAN | 1001 |
| MR.SUNIL S.ACHAREKAR | 1000 |
| MR.PRASHANT ADAWADKAR | 1000 |
| SMT.VIDYA R.BADRI | 1000 |
| MR.PRAKASH P.BAIT | 1000 |
| MR.KESHAV V.BHAT | 1000 |
| MR.LAXMAN S.BHAWARI | 1000 |
| MR.TULSHIRAM S.BOBADE | 1000 |
| SMT.PALLAVI BONDRE | 1000 |
| MR.SUDHAKAR S.CHAVAN | 1000 |
| MR.PURUSHOTTAM A.CHORNIYA | 1000 |
| MR.PANDURANG S.CHOUDHARI | 1000 |
| SMT.SHILPA V.DESHPANDE | 1000 |
| SMT.VARSHA S.DIXIT | 1000 |
| MR.PRAKASH S.GAWADE | 1000 |
| MR.PRATAPSING GIRASE | 1000 |
| MR.RAJENDRA N.GUDE | 1000 |
| MR.R.H.GUJRATHI | 1000 |
| MR.GANGADHAR GUNDE | 1000 |
| MR.MALKAPPA HATTALLI | 1000 |
| MR.DAGADU G.JADHAV | 1000 |
| MR.SUHAS I.JAIN | 1000 |
| SMT.SUSHAMA K.JAISWAL | 1000 |
| MR.PRADEEP S.JOSHI | 1000 |
| SMT.UJJWAL KAISHAP | 1000 |
| SMT.ASHVINI A.KAMATE | 1000 |
| MR.SHRIKANT P.KANADE | 1000 |
| MR.SUDHIR M.KANE | 1000 |
| SMT.ANJALI A.KANTE | 1000 |
| SMT.NANDINI N.KARADKAR | 1000 |
| SMT.SHOBHA KARAMCHAND | 1000 |
| SMT.KANCHAN V.KARANDE | 1000 |
| MR.KARNAIL S.KUSHAL | 1000 |
| MR.MILIND D.KELKAR | 1000 |
| MR.BHALCHANDRA M.KONDALKAR | 1000 |
| MR.SURESH N.KOTHAVADE | 1000 |
| MR.SHASHIKANT S.KULKARNI | 1000 |
| SMT.DISHA V.KULKARNI | 1000 |
| SMT.REWA R.KULKARNI | 1000 |
| MR.RAMESH GOPAL MADHAVI | 1000 |
| MR.M.M.MAJJGGI | 1000 |
| SMT.ANJALI K.MARATHE | 1000 |
| SMT.PRASANNA S.MENON | 1000 |
| MR.RAMESH B.MESTRY | 1000 |
| MR.PRAKASH B.MORE | 1000 |
| MR.RAMESH MUJUMDAR | 1000 |
| SMT.SNEHA S.MULE | 1000 |
| MR.TAJUDDIN M.MULLA | 1000 |
| MR.SHIVAJI N.MURKUTE | 1000 |
| SMT.SHUBHANGI B.NAKHAWA | 1000 |
| SMT.SHANTA NARAYAN | 1000 |
| SMT.MINAKSHI NATRAJAN | 1000 |
| MR.MILIND M.OKA | 1000 |
| MR.PARAG PALEJA | 1000 |
| MR.MAKARAND PANCHBHAI | 1000 |
| MR.SUBHASH V.PARAB | 1000 |
| MR.SUMANGAL PARANJAPE | 1000 |
| SMT.APARNA D.PARCHURE | 1000 |
| MR.CHANDRASHEKHAR PATHADE | 1000 |
| MR.SHIVAJI M.PAWAR | 1000 |
| MR.VILAS R.PAWAR | 1000 |
| MR.BABUJI D.POWALE | 1000 |
| MR.RAVINDRA P.RAJOREKAR | 1000 |
| MR.RAJARAM RANE | 1000 |
| MR.SHIVRAM G.RANE | 1000 |

| | |
|---|---|
| SMT.SHUBHANGI G.RANMANE | 1000 |
| SMT.PRATIBHA B.RATHOD | 1000 |
| MR.ARUN A.RAUT | 1000 |
| MR.ARJUN T.RAUT | 1000 |
| MR.SACHIDANAND | 1000 |
